# उमेदवारांसाठी महत्वाची सुचना

पोलीस अधीक्षक, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ ची लेखी परीक्षा Maulana Azad College of Arts, Science & Commerce, Dr. Rafiq Zakaria Campus Post Box No. 27, D-. Rafiq Zakaria Marg, Rauza Bagh, Chhatrapati Sambhajinagar -431001 येथे दि. १५/०३/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी लेखी परीक्षा अत्यंत पारदर्शक पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टिने उपस्थित असणा-या उमेदवारांनी खालील सुचनांचे पालन करावे.

उमेदवारांसाठी सुचना :-

१. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ०८:०० वा. हजर रहावे

२. उमेदवार परीक्षा केंद्रात प्रवेश करतांना त्याचेजवळ मैदानी चाचणीवेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र तसेच प्रवेशपत्रामध्ये नमुद केलेले दोन पासपोर्ट साईज आकाराचे फोटो उमेदवाराकडे असतील तरच उमेदवारास परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येईल.

३. सर्व उमेदवारांस लेखी परीक्षेकरीता बॉल पॉईंट पेन व लेखनासाठी पॅड उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच परीक्षा केंद्रातील प्रत्येक हॉल मध्ये एक घडयाळ लावण्यात येणार आहे. त्यामुळे सुचना क्र.२ मधील प्रवेशपत्र व पास पोर्ट फोटो व्यतिरीक्त इतर कोणतेही साहित्य उदा. पेन, पेन्सिल, खोड रबर, मनगटी घडयाळ किंवा ईतर साहित्य परीक्षा केंद्रावर नेण्यास प्रतिबंध आहे.

४. लेखी परीक्षा CCTV कॅमेरेच्या निगराणी खाली होणार असुन उमेदवारांच्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रात भ्रमणध्वनी / डिजीटल डायरी / मायक्रोफोन / मायक्रो कॅमेरा डिव्हाईस / कॅल्क्युलेटर /डिजिटल नोट पॅड / नोट्स पुस्तके / ईअरफोन / हिअरिंग एड डिव्हाईस / स्मार्ट वॉचेस / स्मार्ट आय ग्लासेस इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होऊ शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. उमेदवार कॉपी करताना आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतून बाद ठरवण्यात येईल व त्याचेविरुध्द महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम 2024 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

(स्वाती भोर)
पोलीस अधीक्षक
तथा अध्यक्ष पोलीस शिपाई भरती २०२४-२५
लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner